**४७) संचालक मंडळावरील रिक्त जागा :**

संचालक मंडळावरील कोणतीही जागा रिक्त झाल्यास सदर जागा कायद्याच्या कलम ७३ सीबी मधील तरतूदीनुसार भरली जाईल.

**४८) संचालक मंडळ सभा :**

१) संचालक मंडळापुढे चर्चेसाठी आलेल्या विषयावर बहुमताने निर्णय होतील. जेथे समान मते पडतील तेथे सदर सभेच्या अध्यक्षास एक निर्णायाक मत (कास्टींग वोट) देण्याचा अधिकार राहील.

२) संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त त्या कारणासाठी ठेवलेल्या इतिवृत्त पुस्तकांत नोंदणे आवश्यक आहे.

३) बँकेच्या अध्यक्षांच्या परवानगीने मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळ सभा बोलवतील.

४) महिन्यातून किमान एकदा संचालक मंडळाची सभा होणे आवश्यक आहे.

५) संचालक मंडळाची सभा शक्यतो बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयात अथवा बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये ठेवण्यात यावी.

६) बँकेचे अध्यक्ष हे संचालक मंडळ सभेचे अध्यक्ष राहतील. त्यांच्या अनुपस्थितीत बँकेचे उपाध्यक्ष हे सभेचे अध्यक्ष राहतील. वरील दोघांच्या अनुपस्थितीत सदर संचालक मंडळ सभेस उपस्थित असणारे संचालक त्यांचेमधून एकाची त्या सभेकरीता अध्यक्ष म्हणून निवड करतील.

७) संचालक मंडळ सभेची नोटीस ७ दिवसांच्या पूर्व सुचनेने पाठविणे आवश्यक आहे.

८) अध्यक्ष हे सर्व संचालक मंडळ व कार्यकारी समितीचे सभेचे अध्यक्ष राहतील.

**४९) संचालक मंडळाच्या उपसमित्या :**

संस्थेचे संचालक मंडळ एका कार्यकारी समितीचे आणि इतर समित्यांचे अथवा उपसमित्यांचे गरजेनुसार गठन करेल. कार्यकारी समिती सोडून इतर उपसमित्यामध्ये जास्तीत जास्त ५ सदस्य असतील.

**५०) तक्रार निवारण व तडजोड समिती :**

सभासद आणि संस्था यांचेमध्ये वेळोवेळी निर्माण होणारे वाद, तक्रारी यांचे निराकरण करणेसाठी तसेच संस्थेचे थकबाकीदार आणि संस्था यांचेमधील वाद मिटविण्यासाठी/तडजोड करणेसाठी संचालक मंडळ एका तक्रार निवारण व तडजोड समितीची स्थापना करेल. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

अ) अध्यक्ष – प्रतिथयश बँकर असणे आवश्यक. (सदर व्यक्ती ही बँकेच्या व्यवस्थापनाचा सदस्य नसावी.)